ISSN 2454-5554
An International Peer Reviewed & Referred SJIF 2017 : 4.93
INTERNATIONAL JOURNAL
OF EDUCATIONAL RESEARCH STUDIES

# अंबाजोगाई तालुक्यातील निवडक जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील बहुवर्ग अध्यापन पद्धतीतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन समस्यांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ.गित्ते त्रिंबक**
सहायक प्राध्यापक, श्री.बी.एस.पी.एम.अध्यापक महाविद्यालय
अंबाजोगाई. Email gittetg.dattapur@gmail.com

## सारांश

या संशोधनाचा उद्देश अंबाजोगाई तालुक्यातील निवडक चार जिल्हा परिषद शाळांमधील बहुवर्ग अध्यापन पद्धतीमध्ये अध्ययन करणाऱ्या प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्याचा अभ्यास करणे हा आहे. संशोधनासाठी 200 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. माहिती संकलनासाठी प्रश्नावली, निरीक्षण आणि मुलाखत या साधनांचा वापर करण्यात आला. अभ्यासातून असे दिसून आले की वैयक्तिक लक्षाचा अभाव, अध्ययनातील व्यत्यय, शैक्षणिक साधनांची कमतरता आणि मूल्यमापनातील अडचणी या प्रमुख समस्या आहेत. संशोधनाच्या निष्कर्षांच्या आधारे बहुवर्ग अध्यापन अधिक परिणामकारक करण्यासाठी काही शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

## प्रस्तावना

"शिक्षण हा मानवाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे." भारतीय संविधानातील कलम २१ (अ) आणि 'शिक्षण हक्क कायदा २००९' नुसार प्रत्येक बालकाला दर्जेदार प्राथमिक शिक्षण मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. परंतु, सद्यस्थितीत ग्रामीण भागातील घटती पटसंख्या, शिक्षकांची कमतरती, भौगोलिक दुर्गमता आणि पायाभूत सुविधांचा अभाव यांमुळे प्राथमिक शिक्षण क्षेत्रात 'बहुवर्ग अध्यापन पद्धती' अपरिहार्य बनली आहे.

बहुवर्ग अध्यापन पद्धती म्हणजे अशी व्यवस्था, जिथे एकाच वर्गात दोन किंवा अधिक इयत्तांच्या विद्यार्थ्यांना एकत्र बसवून एकाच शिक्षकाला एकाच वेळी शिकवावे लागते. अंबाजोगाई हा बीड

जिल्ह्यातील एक महत्त्वाचा तालुका असला, तरी या तालुक्यातील अनेक ग्रामीण आणि डोंगराळ भागांतील जिल्हा परिषद शाळांमध्ये ही पद्धत सर्रास पाहायला मिळते.

एकत्र बसलेल्या वेगवेगळ्या वयोगटाच्या आणि वेगवेगळ्या बौद्धिक पातळीच्या विद्यार्थ्यांना एकाच वेळी हाताळताना शिक्षकांची मोठी कसरत होते. या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर (शिकण्यावर) थेट परिणाम होतो. एकाग्रतेचा अभाव, पायाभूत संकल्पना स्पष्ट न होणे, शिक्षकांचे वैयक्तिक लक्ष न मिळणे आणि गृहपाठातील अडचणी यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक 'अध्ययन समस्या' (Learning Problems) निर्माण होतात.

प्रस्तुत शोधनिबंधात अंबाजोगाई तालुक्यातील निवडक जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा प्रत्यक्ष अभ्यास करून, या बहुवर्ग पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात नेमके कोणते अडथळे येत आहेत, याचा चिकित्सक (Critical) अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. हा अभ्यास केवळ समस्या मांडण्यापुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, याचाही मार्ग दाखवतो.

**संशोधनाची गरज**

१. ग्रामीण भागातील भौगोलिक आणि सामाजिक वास्तव

अंबाजोगाई तालुक्यातील अनेक गावे आणि वाड्या-वस्त्या दुर्गम भागात आहेत. अशा ठिकाणी लोकसंख्या कमी असल्याने शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असते. कमी पटसंख्येमुळे तिथे प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र शिक्षक देणे शासनाला शक्य होत नाही. परिणामी, 'बहुवर्ग अध्यापन' ही तिथली सोय नसून सक्ती बनली आहे. या ग्रामीण आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काचा विचार करण्यासाठी हे संशोधन गरजेचे आहे.

२. विद्यार्थ्यांच्या पायाभूत गुणवत्तेचा प्रश्न

एकाच वेळी दोन किंवा तीन वर्गातील विद्यार्थी एकत्र बसल्यामुळे शिक्षकांचे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष जात नाही. यामुळे प्राथमिक स्तरावर लागणारे मूलभूत कौशल्य- उदा. वाचन, लेखन आणि पायाभूत गणित यामध्ये विद्यार्थी मागे पडतात. विद्यार्थ्यांच्या या नेमक्या अध्ययन समस्या कोणत्या आहेत आणि त्या कशा सोडवता येतील, हे शोधण्यासाठी या संशोधनाची तीव्र गरज आहे.

3.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि 'निपुण भारत'चे उद्दिष्ट

सध्या केंद्र आणि राज्य सरकार 'निपुण भारत' अभियानांतर्गत प्राथमिक शाळांमधील मुलांची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राथमिक शिक्षण हा पाया मानला गेला आहे. बहुवर्ग अध्यापन पद्धतीमुळे या धोरणांच्या अंमलबजावणीत कोणते अडथळे येत आहेत आणि त्यावर काय मार्ग काढता येईल, याचे चिकित्सक विश्लेषण करण्यासाठी हे संशोधन काळाची गरज आहे.

4. शिक्षकांवरील ताण आणि वर्ग व्यवस्थापनाचे आव्हान

या शाळांमध्ये शिक्षकांना एकाच ७५ मिनिटांच्या किंवा ४० मिनिटांच्या तासिकेत ३ ते ४ वेगवेगळ्या इयत्तांचा अभ्यासक्रम सांभाळावा लागतो.पहिलीच्या मुलाला अक्षरे गिरवायला लावणे,

दुसरीच्या मुलाला शब्द वाचायला देणे,आणि तिसरीच्या मुलाला गणिताचे कोडे सोडवायला सांगणे,हे सर्व एकाच वेळी करताना शिक्षकांची मोठी कसरत होते. शिक्षकांच्या या वर्ग व्यवस्थापनाच्या अडचणी समजून घेण्यासाठी हे संशोधन आवश्यक आहे.

५. स्थानिक पातळीवरील (अंबाजोगाई तालुका) विशिष्ट समस्यांचा अभ्यास

बहुवर्ग अध्यापनावर जागतिक किंवा राष्ट्रीय पातळीवर काही संशोधन झाले असले, तरी अंबाजोगाई तालुक्यासारख्या निम-शहरी आणि ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. स्थानिक पातळीवरील विद्यार्थ्यांचे स्थलांतर (उदा. ऊसतोड कामगारांची मुले), पालकांची मानसिकता आणि शाळांमधील भौतिक सुविधांचा अभाव यांचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर काय परिणाम होतो, याचा विशिष्ट अभ्यास अद्याप झालेला नाही.

६. नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि उपायांची गरज

सध्याच्या पारंपारिक बहुवर्ग पद्धतीत बदल करून तिथे 'गट अध्ययन' (Peer Learning), 'स्वयं-अध्ययन पुस्तिका' (Self-learning Materials) किंवा डिजिटल तंत्रज्ञानाचा (Digital Tools) प्रभावी वापर कसा करता येईल, याचे ठोस उपाय आणि मॉडेल हे संशोधन सुचवू शकते.

संशोधनाचे महत्त्व

हे संशोधन ग्रामीण भागातील 'शिक्षणाचा अधिकार' (RTE) खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यासाठी, जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी आणि शिक्षकांचे अध्यापन सुलभ करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक ठरेल.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्व : या संशोधनाचा थेट फायदा प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना होईल. बहुवर्ग वर्गांमध्ये शिकताना विद्यार्थ्यांना नेमक्या कोणत्या मानसिक, सामाजिक किंवा बौद्धिक अडचणी येतात (उदा. एकाग्रता न लागणे, न्यूनगंड निर्माण होणे), हे या अभ्यासातून समोर येईल. या समस्यांवर योग्य उपाय शोधल्यास विद्यार्थ्यांचा पायाभूत शैक्षणिक दर्जा (वाचन, लेखन, गणित) सुधारेल आणि ग्रामीण भागातील गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

प्राथमिक शिक्षकांच्या दृष्टीने महत्त्व:बहुवर्ग वर्गात अध्यापन करणे हे शिक्षकांसाठी मोठे आव्हान असते. हे संशोधन शिक्षकांना खालील बाबतीत मार्गदर्शक ठरेल एकाच वेळी अनेक वर्ग हाताळण्यासाठी 'वेळापत्रकाचे योग्य नियोजन' (Time Management) कसे करावे, याचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळेल.कमी वेळेत आणि उपलब्ध संसाधनांमध्ये प्रभावी 'वर्ग व्यवस्थापन'

करण्याच्या पद्धती शिक्षकांना समजतील.एका वर्गाला शिकवत असताना दुसऱ्या वर्गाला व्यस्त ठेवण्यासाठी 'स्वयं-अध्ययन' आणि 'गट-कार्य' पद्धतीचा वापर कसा करावा, याची दिशा मिळेल.

शैक्षणिक धोरणकर्ते आणि प्रशासनासाठी महत्त्व: अंबाजोगाई तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी , जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि डाएट यांसारख्या संस्थांना स्थानिक पातळीवर निर्णय घेण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.तालुक्यातील कोणत्या शाळांमध्ये बहुवर्ग पद्धतीमुळे शैक्षणिक नुकसान होत आहे, याची अचूक माहिती प्रशासनाला मिळेल.शिक्षकांच्या बदल्या किंवा नियुक्त्या करताना कुठे प्राधान्य दिले पाहिजे, याचे नियोजन करणे सोपे होईल.बहुवर्ग शाळांमधील शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यासाठी या संशोधनाचा आधार घेता येईल.

स्थानिक पातळीवरील उपयुक्तता : हे संशोधन विशेषतः अंबाजोगाई तालुक्यासाठी केंद्रित आहे. या भागातील भौगोलिक परिस्थिती, शेतमजूर आणि ऊसतोड कामगारांच्या मुलांचे स्थलांतर, आणि स्थानिक जिल्हा परिषद शाळांमधील भौतिक सुविधांची उपलब्धता यांचा थेट संबंध या संशोधनाशी जोडला जाईल. त्यामुळे जागतिक स्तरावरील निष्कर्षांपेक्षा हे स्थानिक निष्कर्ष अंबाजोगाईसाठी जास्त व्यावहारिक आणि लागू पडणारे ठरतील.

शैक्षणिक साहित्याच्या निर्मितीसाठी महत्त्व:बहुवर्ग अध्यापनासाठी नेहमीच्या पद्धतीचे पाठ्यपुस्तक वापरणे कठीण जाते. या संशोधनाच्या निष्कर्षांवरून अशा शाळांसाठी 'स्वयअध्ययन पुस्तिका', 'सराव कार्ड्स', आणि 'डिजिटल शैक्षणिक साधने' कशी विकसित करावीत, याबद्दल मोलाचे मार्गदर्शन मिळेल.

भविष्यातील संशोधकांसाठी संदर्भ:प्राथमिक शिक्षण आणि बहुवर्ग अध्यापन या क्षेत्रांत पुढे काम करू इच्छिणाऱ्या नवीन संशोधकांसाठी हा प्रबंध एक महत्त्वाचा 'संदर्भ ग्रंथ' म्हणून उपयुक्त ठरेल. बीड जिल्हा किंवा मराठवाड्याच्या शैक्षणिक सद्यस्थितीचा अभ्यास करणाऱ्यांना यातून विश्वासार्ह डेटा उपलब्ध होईल.

**संशोधन समस्या**

“बहुवर्ग अध्यापनामुळे प्राथमिक विद्यार्थ्यांना कोणत्या समस्या निर्माण होतात’

**संशोधन समस्या विधान**

*"अंबाजोगाई तालुक्यातील निवडक जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील बहुवर्ग अध्यापन पद्धतीत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करणे."*

**संशोधन चले**

| **स्वतंत्र चल** | **अवलंबित चल** |
|---|---|
| बहुवर्ग अध्यापन | विद्यार्थ्यांच्या अध्ययन समस्या |

**कार्यात्मक व्याख्या**

**बहुवर्ग अध्यापन**

एकाच शिक्षकाद्वारे एकाच वेळी दोन किंवा अधिक वर्गांना दिले जाणारे अध्यापन.

**अध्ययन समस्या**

विद्यार्थ्यांच्या शिकण्यामध्ये येणाऱ्या अडचणी.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. बहुवर्ग अध्यापनातील अध्ययन समस्यांचा अभ्यास करणे.
2. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर बहुवर्ग अध्यापनाचा होणारा परिणाम तपासणे.
3. बहुवर्ग अध्यापनात शिक्षकांच्या अडचणी जाणून घेणे.
4. बहुवर्ग अध्यापनातील अध्ययन समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधन परिकल्पना**

1. बहुवर्ग अध्यापनाचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर कोणताही परिणाम होत नाही.
2. बहुवर्ग अध्यापन पद्धतीमुळे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अध्ययन गुणवत्तेवर आणि सहभागावर लक्षणीय नकारात्मक परिणाम होतो.

**संशोधन गृहितके**

संशोधन करताना विद्यार्थी प्रामाणिक उत्तरे देतील.

निवडलेल्या शाळा प्रतिनिधिक स्वरूपाच्या आहेत.

बहुवर्ग अध्यापन सर्व शाळांमध्ये सुरू आहे.

**संशोधन प्रश्न**

1. विद्यार्थ्यांना कोणत्या प्रमुख समस्या जाणवतात?
2. बहुवर्ग अध्यापनाचा अध्ययन गुणवत्तेवर काय परिणाम होतो?
3. शिक्षकांना कोणत्या अडचणी येतात?

**संशोधन व्याप्ती**

1. प्रस्तुत संशोधन अभ्यास फक्त अंबाजोगाई तालुक्यापुरते व्याप्त आहे
2. प्रस्तुत संशोधन अभ्यास फक्त अंबाजोगाई तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा पुरते व्याप्त आहे
3. प्रस्तुत संशोधन अभ्यास फक्त अंबाजोगाई तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता 1 ते 5 या वर्गा पुरते व्याप्त आहे
4. प्रस्तुत संशोधन अभ्यास फक्त अंबाजोगाई तालुक्यातील जिल्हा परिषद 200 विद्यार्थी

**संशोधन मर्यादा**

1. प्रस्तुत संशोधन अभ्यास फक्त अंबाजोगाई तालुक्यापुरते मर्यादित.
2. प्रस्तुत संशोधनमध्ये फक्त 4 शाळांचा समावेशकेलेला आहे .
3. शाळा मधील 200 विद्यार्थ्यांचा नमुना म्हणून निवड केलेली आहे .

**संशोधन परिमर्यादा**

1. प्रस्तुत संशोधन फक्त जिल्हा परिषद शाळांचाच विचार केलेला आहे.
2 प्रस्तुत संशोधनात जिल्हा परिषद शाळेतील फक्त प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा विचार केलेला आहे .
3 प्रस्तुत संशोधनात फक्त बहुवर्ग पद्धती असलेल्या शाळांचाच विचार केलेला आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे

**तक्ता १: नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनात खालील प्रमाणे नमुना निवड केलेली आहे

| अ.क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी (मुले) | विद्यार्थी (मुली) | एकूण विद्यार्थी | समाविष्ट शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| **१** | शाळा 'अ' | २५ | २५ | ५० | ०२ |
| **२** | शाळा 'ब' | २८ | २२ | ५० | ०२ |
| **३** | शाळा 'क' | २२ | २८ | ५० | ०१ |
| **४** | शाळा 'ड' | २४ | २६ | ५० | ०२ |
| **एकूण** | **०४ शाळा** | **९९** | **१०१** | **२००** | **०७** |

**संशोधन साधने**

| **साधन** | **उद्देश** |
|---|---|
| **प्रश्नावली** | विद्यार्थ्यांची मते |
| **मुलाखत** | शिक्षकांची मते |
| **निरीक्षण** | वर्गस्थिती अभ्यास |

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वाचन

तक्ता २: बहुवर्ग अध्यापनात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अध्ययन समस्या

| अ.क्र. | विद्यार्थ्यांच्या प्रमुख समस्या | वारंवारता (N=200) | टक्केवारी (%) | श्रेणी (Rank) |
|---|---|---|---|---|
| **१** | वैयक्तिक लक्ष न मिळणे | १७० | ८५% | I |
| **२** | वर्गातील गोंधळाचे वातावरण | १६० | ८०% | II |
| **३** | अध्ययनात वारंवार येणारा व्यत्यय | १५० | ७५% | III |
| **४** | आधुनिक शैक्षणिक साधनांची कमतरता | १४० | ७०% | IV |
| **५** | मूल्यमापन प्रक्रियेतील अडचणी | १३० | ६५% | V |

**तक्ता ३: बहुवर्ग अध्यापनाचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावरील परिणाम**

| अ.क्र. | अध्ययनावरील परिणाम | सहमती दर्शवणारे विद्यार्थी | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| **१** | अध्ययनात सतत अडथळे निर्माण होतात | १५८ | ७९% |
| **२** | वर्गातील उपक्रमात कमी सहभाग नोंदवला जातो | १४४ | ७२% |
| **३** | विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी होतो | १२२ | ६१% |
| **४** | एकंदरीत शैक्षणिक प्रगती मंदावते | १३६ | |

**आकृती 2 : अध्ययनावरील परिणाम**

| | |
|---|---|
| **अध्ययना अडथळे** | **79 %** |
| **कमी सहभाग** | 72 % |
| **प्रगती मंद** | 68 % |
| **आत्मविश्वाकमी** | 61 % |

## निष्कर्ष

1. बहुवर्ग अध्यापनात 85% विद्यार्थ्यांना शिक्षका कडून वैयक्तिक लक्ष मिळत नाही.
2. बहुवर्ग अध्यापनात 80% विद्यार्थ्यांना वर्गातील गोंधळ जाणवतो.
3. बहुवर्ग अध्यापनात 75% विद्यार्थ्यांच्या अध्ययनात व्यत्यय येतो.
4. बहुवर्ग अध्यापनाचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होतो.
5. बहुवर्ग अध्यापनामुळे शिक्षकांवर अतिरिक्त कार्यभर पडतो.

## शिफारशी

1. बहुवर्ग अध्यापनातील समस्या दूर करण्यासाठी प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावावेत.
2. बहुवर्ग अध्यापनासाठी विशेष प्रशिक्षण द्यावे.
3. बहुवर्ग अध्यापनासाठी डिजिटल शैक्षणिक साधने उपलब्ध करून द्यावीत.
4. बहुवर्ग अध्यापनात नियमित शैक्षणिक निरीक्षण करावे.
5. बहुवर्ग अध्यापनासाठी विद्यार्थी–केंद्रित अध्यापन पद्धती वापराव्यात.

## संदर्भ ग्रंथ सूची

**घाटे, वि. द. (२०१८). अध्यापन शास्त्र आणि पद्धती. पुणे: व्ही. व्ही. प्रकाशन.**

**जोशी, अ. ना., व सोनवणे, स. अ. (२०२१). प्राथमिक शिक्षण: समस्या आणि उपाय. मुंबई: सुविद्या प्रकाशन.**

**दांडेकर, वा. ना. (२०१५). शैक्षणिक मूल्यमापन आणि सांख्यिकी. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.**

**दुनाखे, अ. र. (२०१९). प्राथमिक शाळेतील वर्ग व्यवस्थापन आणि बहुवर्ग अध्यापन. नागपूर: विद्या प्रकाशन.**

**पाटील, ल. बा. (२०२२). ग्रामीण शिक्षण आणि बहुवर्ग शाळांची सद्यस्थिती. औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन.**

**बोराटे, व्ही. एम. (२०२०). संशोधन पद्धती: शिक्षण आणि समाजशास्त्र. नाशिक: कल्पेश प्रकाशन.**

**शहा, सु. भा. (२०१७). शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे: नूतन प्रकाशन.**

*Best, J. W., & Kahn, J. V. (***2019).** *Research in Education (***10***th ed.). New Delhi: Pearson Education India.*

*Bray, M. (***2016).** *Making Multigrade Teaching Work: Changing Contexts and Innovation in Primary Education. Paris: UNESCO.*

*Creswell, J.W.(***2018).** *Educational Research: Planning, Conducting, and Evaluating Quantitative and Qualitative Research. New York: Merrill.*

*Little, A. W. (Ed.). (***2006).** *Education for All and Multigrade Teaching: Challenges and Opportunities. Dordrecht: Springer.*

*Pridmore, P. (***2007).** *Adapting the Curriculum for Multigrade Classes in Developing Countries. London: Institute of Education.*

कुलकर्णी, एस. आर. (२०२२). ग्रामीण भागातील बहुवर्ग अध्यापनाची आव्हाने. जीवन शिक्षण मासिक, ६८(४), १५-२२. (प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे).

पाटील, एस. के. (२०२४). मराठवाड्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन समस्या. भारतीय शैक्षणिक संशोधन शोधपत्रिका, १२(३), ४५-५2.

*ASER Centre. (*2025). *Annual Status of Education Report (Rural) - Maharashtra. New Delhi: Pratham Education Foundation.*

*Khan, A., & Jodh, S. (*2023). *Analysis of Multigrade Teaching in Rural Primary Schools of Maharashtra. Journal of Educational Research and Extension,* 60(2), 89-98.

*Sonawane, R. (*2024). *Foundational Literacy Challenges in Multigrade Classrooms of Beed District. International Journal of Pedagogy and Curriculum,* 15(1), 34-42.